# निसर्ग चक्र

E Mail : nisargchakra2001@gmail.com  RNI.No. MAHMAR/2022/83338  कार्यकारी संपादिका : सौ.सिमा राजेंद्र वखरे

वर्ष : ०२ ★ अंक : ०३ ★ मराठी साप्ताहिक ★ पाने : ४ ★ कल्याण, जि. ठाणे ★ मंगळवार, दि. २५ जुलै ते ३१ जुलै २०२३ ★ मूल्य : रु ५.००/- ★ आर.एन.आय.नं. एमएएचएमएआर /२०२२/८३३३८

Vol : 02 ★ Issue : 03 ★ Marathi Weekly ★ Pages : 4 ★ Kalyan, Dist Thane ★ Tuesday, Date : 25 July To 31 July 2023 ★ Price 5.00 /- ★ NISARG CHAKRA : Mob.No. 9619630035


## बाल संरक्षण कक्षासाठी केंद्र सरकार कार्यालय उपलब्ध करुन देणार

**- केंद्रीय मंत्री श्रीमती स्मृती इराणी**

**मुंबई** : जिथे बाल कल्याण समिती यांना कार्यालय नाहीत तसेच बाल संरक्षण कक्ष नाहीत अशा ठिकाणी केंद्रीय महिला बाल विकास मंत्रालय या कार्यालयांची निर्मिती करेल आणि निधी देखील उपलब्ध करून देईल अशी घोषणा




केंद्रीय महिला व बाल कल्याण, अल्पसंख्यांक मंत्री स्मृती जुबिन इराणी यांनी केली.

षण्मुखानंद ऑडिटोरियम, सायन पूर्व मुंबई येथे राष्ट्रीय बाल संरक्षण आयोग भारत सरकार व महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने "वत्सल भारत" या विभागीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात केंद्रीय महिला व बाल कल्याण, अल्पसंख्यांक मंत्री स्मृती इराणी बोलत होत्या.

या कार्यक्रमास महाराष्ट्र सह गुजरात, आंध्रप्रदेश, गोवा, दादरा नगर हवेली, दमन, दिव राज्यातील सदस्य सहभागी झाले होते.

केंद्रीय मंत्री श्रीमती इराणी म्हणाल्या, 'चाइल्ड ट्रॅकिंग" या सिस्टमच्या माध्यमांतून जी मुले हरवली होती अशी देशातील चार लाख मुले शोधली आहेत आणि त्या मुलांना सुरक्षितपणे त्यांच्या कुटुंबांपर्यंत पोहोचवण्याचं काम केलं गेलं आहे. २ हजार ५०० मुलं ही दत्तक घेतली गेली आहेत. पोक्सो अंतर्गत महिलांना भारत सरकार पूर्णपणे मदत करणार असून त्यांचा कायदेशीरदृष्ट्या येणारा आर्थिक भार देखील भारत सरकार उचलणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात अवैध मानवी तस्करी रोखण्यासाठी युनिट बनवलेले आहे, यामध्ये काही त्रुटी असतील तर त्या जरूर आम्हाला कळवाव्यात. प्रत्येक गावागावाच्या बाल सुरक्षा समित्या कार्यरत आहेत.

ग्रामपंचायत स्तरावर एखाद्या बालकाला जर मदतीची आवश्यकता असले तर त्याची माहिती भारत सरकारला कळवावी, आम्ही त्याच्यासाठी नक्की मदत करू.प्रत्येक जण आप आपल्या परीने स्वताच्या राज्यातील वेगवेगळ्या शासकीय व निम शासकीय आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून लहान मुलांची बालकांची काळजी सर्मपित भाव ठेऊन सेवा देत आहात याबद्दल मी सर्वांचे आभार मानते. प्रत्येक बालकाला शिक्षण घेण्याचा हक्क आहे. शिक्षणापासून एकही बालक वंचित राहू नये यासाठी केंद्र शासन पूर्णपणे प्रयत्न करेल असेही मंत्री श्रीमती स्मृती इराणी म्हणाल्या.

यावेळी केंद्रीय महिला बालविकास विभागाचे अतिरिक्त सचिव संजीव कुमार चड्डा यांनी बाल हक्क अधिनियम कशाप्रकारे लागू केला जात आहे, वत्सल भारत योजनेबाबत माहिती दिली.

यावेळी सहसचिव इंद्रा मालो यांनी वत्सल भारत योजनेसाठी सर्व राज्यांचे सहकार्य मिळत असल्याबद्दल सर्वांचे आभार मानले तसेच मिशन वस्तूंचे ते पोर्टल देखील लॉन्च केले असल्याची माहिती यावेळी दिली.

केंद्रीय बाल संरक्षण बालसुरक्षा आणि बाल कल्याण विभागाच्या सदस्य सचिव रूपाली बॅनर्जी, महाराष्ट्र राज्याचे महिला बाल विकास विभागाचे सचिव डॉ.अनुपकुमार यादव, महिला व बालविकास आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, उपायुक्त राहुल मोरे, बापूराव भवाने, जिल्हा महिला बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड, शोभा शेलार आणि अब्दुल चौधरी यासह राज्यातील जिल्हा महिला बालविकास अधिकारी उपस्थित होते.★★★

## अतिवृष्टीने नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करा

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश**
**स्थलांतरित नागरिकांना सर्व सुविधा पुरवा**



**मुंबई** : बुलढाणा, यवतमाळ आणि अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जिल्ह्यांमधील पिकांचे तातडीने पंचनामे करुन शासनाकडे लवकर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. अतिवृष्टीग्रस्त भागातील नागरिकांना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्याचे निर्देशही मुख्य मंत्र्यांनी दिले आहेत.बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर, जळगाव जामोद तसेच यवतमाळ, नांदेडसह अनेक जिल्ह्यांमध्ये काल झालेल्या अतिवृष्टीमुळे या भागातील पिके पाण्याखाली गेले आहेत. शेतीचेदेखील मोठे नुकसान झाले आहे. जिल्हा प्रशासनाने या झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करून शासनाकडे लवकर प्रस्ताव पाठविण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिव आणि मदत व पुनर्वसन विभाग तसेच मुसळधार पाऊस झालेल्या क्षेत्रातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली. पुरामुळे जनजीवन विस्कळीत झालेल्या भागातील ग्रामस्थांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले असून त्यांना स्थानिक ग्रामस्थांच्या घरांच्या नुकसानीचेदेखील पंचनामे करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

अतिवृष्टीमुळे पूर आलेल्या गावांमधील ग्रामस्थांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले असून त्यांची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे, त्याठिकाणी ग्रामस्थांना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यात याव्यात आणि आपत्तीकाळात जिल्हा प्रशासनाने दक्ष राहण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

## जिल्हाधिकारी ठरले अपघातग्रस्त तरुणासाठी देवदूत!

**तरुणाची प्रकृती स्थिर : जिल्हाधिकाऱ्यांच्या संवेदनशीलतेचे दर्शन**

जळगाव : नशिराबाद पुलावर गुरूवारी रात्री दहाच्या सुमारास अपघात होऊन अत्यवस्थ अवस्थेतील तरूणां साठी तेथून जाणारे जिल्हाधिकारी अमन मित्तल देवदूत ठरले. जिल्हाधिकाऱ्यांनी दाखविलेल्या संवेदनशीलतेमुळे त्यांचे समाजाच्या सर्व स्तरातून कौतुक होत आहे. रावेरहून पूर परिस्थितीचा

वीस मिनिटाच्या कालावधीतच त्याला दवाखान्यात दाखल केल्यामुळे तरूणाचा जीव वाचला आहे ?. जिल्हाधिकाऱ्यांनी रूग्णालय वाहिकेची प्रतिक्षा न करता त्यांच्या मागून येणाऱ्या वाहतूक शाखेच्या वाहनात तरूणाला भरती करण्याचा तात्काळ निर्णय घेतला. रूग्णालयात येईपर्यंत दहा मिनिटांच्या कालावधीत जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत:






पाहणी दौरा आटोपून येत असतांना जिल्हा धिकारी मित्तल यांना नशिराबाद पुलावर दुचाकीच्या बाजूला अत्यवस्थ अवस्थेत पडलेला तरुण रूपेश कमलाकर सोनवणे (वय - ३ २ रा. प्रिंपाळे, जळगाव) दिसला. जिल्हाधिकाऱ्यांनी घटनास्थळी त्यांचे वाहन थांबवत, त्यांच्या मागून येणाऱ्या वाहतूक पोलीस शाखेच्या इंटर सेप्टर व्हॅनमध्ये पाठवत डॉ.उल्हासपाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मादाय रूग्णालयात दाखल केले ?. रूपेश च्य नातेवाईकांशी संपर्क होईपर्यंत तसेच प्रकृतीची माहिती येईपर्यंत जिल्हा धिकारी रूग्णालयात मध्यरात्रीपर्यंत स्वत: थांबून होते. अपघातात रूपेश सोनवणेला मेंदूला जबर इजा झाली ? होती. अपघात झाल्यानंतर पंधरा ते

रूग्णालय वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क करून ठेवला.त्यामुळे तरूणाच्या उपचारांसाठी वैद्यकीय चमू सज्ज होता ?जिल्हा धिकाऱ्यांनी तत्परतेने केलेल्या मदतीमुळे तरूणांचे प्राण वाचले आहेत. सध्या या तरूणांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉ. रितेश पाटील यांनी दिली आहे . तरूणाचा जीव वाचवण्यासाठी जिल्हाधिकारी श्री. मित्तल यांना वाहतूक शाखेचे पोलीस हेड कॉन्स्टेबल चंद्रकांत पाटील, पोलीस नाईक विजय पाटील, गणेश वाटे, मिलिंद पाटील, दिपक पाटील, सचिन मोहिते, नागरिक पवन भोई व डॉ. रितेश पाटील यांची मदत झाली.


**वृत्त संपादक : राजेंद्र वखरे**

**मोबाईल नंबर : ९६१९६३००३५**




रामनगर पोलीस स्टेशन डोंबिवली च्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदाचा पदभार नुकताच श्री.नितीन गिते यांनी स्वीकारला.त्यांची निसर्ग चक्र च्या कार्यकारी संपादिका सौ. सीमा वखरे व क्राईम बॉर्डर चे संपादक राजेंद्र वखरे यांनी सदिच्छा भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या तो क्षण.



पोलीस निरीक्षक श्री.मोहन खंदारे यांनी नुकताच विष्णूनगर पोलीस ठाण्याचा वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदाचा पदभार स्वीकारला.त्यांची निसर्ग चक्र च्या कार्यकारी संपादिका सौ. सीमा वखरे व क्राईम बॉर्डर चे संपादक राजेंद्र वखरे यांनी सदिच्छा भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या तो क्षण.

## कल्याण डोंबिवलीतील रस्त्यांची दुरवस्था



कल्याण (प्रतिनिधी) : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील रस्त्यांची अक्षरश: चाळण झाली असून काही मुख्य रस्ते वगळता रस्त्यामध्ये मोठमोठे खड्डे पडले असून याचा वाहन चालकांना व पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे या खड्ड्यांमुळे दुचाकी स्वार व सायकल स्वार तसेच रिक्षा चालक यांना मोठा सामना करावा लागत आहे. याकडे संबंधित विभागाचे पूर्णत: दुर्लक्ष असून तात्काळ किमान रस्त्यांची डाग डुगी करण्याची मागणी जनतेतून होत आहे.

**डोंबिवली वाहतूक पोलिसांनी बुजवले खड्डे** : डोंबिवली वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली वार्डन व पोलिसांनी अशा खड्ड्यांमध्ये माती व दगड टाकून दिलासा दिला आहे . त्यांच्या या कृतीचे जनतेतून कौतुक होत आहे. ★★★



रोटरी क्लब ऑफ डायमंड, डोंबिवली यांच्या वतीने पत्रकारितेत वरिष्ठ पत्रकार म्हणून उल्लेखनीय कामगिरीबद्दल राजेंद्र वखरे यांचा सत्कार करण्यात आला तो अविस्मरणीय क्षण

## कडोंमपा च्या हद्दीत भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट

डोंबिवली (प्रतिनिधी) : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये गल्लीबोळात सध्या भटक्या कुत्र्यांनी धुमाकूळ घातला असून रात्रीच्या वेळेस ते दु चाकी स्वरांच्या अंगावर या कुत्र्यांचे घोडके च्या घोडके अंगावर येत असल्याने वाहन चालक घाबरून खाली पडण्याच्या घटनात वाढ झाली आहे. पावसाळ्याचे दिवस असल्याने या कुत्र्यांनी चावा घेतल्यास नागरिकांच्या जीवितास हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून संबंधित विभागाने अशा भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी जनतेतून होत आहे.★★★

## मोफत गणवेश योजनेचा लाभ स्थानिक पातळी वरुन देण्याचा विचार

**मुंबई :** सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या गणवेशाचा लाभ शाळा व्यवस्थापन समितीद्वारे देण्यात येत आहे. मात्र शालेय गणवेश उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक पातळीवर महिला बचत गटांना देण्याचा सकारात्मक विचार करण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी विधानसभेत सांगितले. शालेय विद्यार्थ्यांच्या गणवेश वाटपाचे काम स्थानिक पातळीवर करण्याबाबतचा प्रश्न सदस्य सर्वश्री अनिल देशमुख, आशिष शेलार यांनी उपस्थित केला होता. मंत्री केसरकर म्हणाले, महिला



बचत गटांना गणवेश तयार करण्याचे प्रशिक्षण देऊन शालेय विद्यार्थ्यांच्या गणवेश वाटपाचे काम स्थानिक पातळी वर देण्याबाबतचा निर्णय घेणार असल्याचे मंत्री केसरकर यांनी सांगितले. ★★★

## अनधिकृत ठरलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ देणार नाही

### - शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर

**मुंबई :** राज्यात शिक्षण विभागा मार्फत विविध शाळांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

यामध्ये खाजगी व्यवस्थापनाद्वारे ६६१ शाळा या अनधिकृतपणे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. या शाळांवर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू असून या शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ दिले जाणार नाही, असे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी विधानसभेत सांगितले.

यातील अनधिकृत शाळांवर कारवाई करण्या बाबतचा प्रश्न विधानसभा सदस्य सर्वश्री हरिभाऊ बागडे,आशिष शेलार, अतुल भातखळकर, रईस शेख, अबू आझमी, सुनील राणे, संजय केळकर, योगेश सागर, अशोक उईके, यामिनी जाधव यांनी उपस्थित केला होता.

मंत्री केसरकर म्हणाले की, या अनधिकृत शाळांमध्ये जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी शाळांना कागदपत्राची तातडीने पूर्तता करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच मुंबईतील अनधिकृत शाळाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी सोबत बैठक घेऊन यावर विद्यार्थी हितासाठी सहनुभूतीपूर्वक निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री श्री केसरकर यांनी सांगितले.

या अनधिकृत शाळांमध्ये शासन मान्यतेनेविना शाळा सुरू करणे, राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळाशी संलग्नतेकरिता आवश्यक असणारे शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र न घेणे, संबंधित परीक्षा मंडळाचे संलग्नता प्रमाणपत्र न घेणे या बाबी निदर्शनास आल्याने संबंधित शाळांवर कारवाई करण्यात येत आहे. तसेच सन २०२२ मध्ये काही शाळांमध्ये शासन मान्यता आदेश हे बनावट असल्याचे निदर्शनास आले आहे. या शाळांवर सुद्धा फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात आली आहे. ★★★

## सहायक सरकारी अभियोक्ता गट-अ पद भरतीसाठी तात्पुरती सर्व साधारण गुणवत्ता यादी जाहीर

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या आस्थापनेवरील सहायक सरकारी अभियोक्ता, गट अ या संवर्गातील ५४७ पदांच्या भरती करिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत लेखी परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेतून मुलाखती करिता पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती आयोगामार्फत घेण्यात आल्या होत्या, त्यातील पात्र उमेद वारांची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेत स्थळावर दि. २१ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या संवर्गाची इतक्या मोठ्या प्रमाणात पदभरती आयोगाने अत्यंत कमी वेळेत पूर्ण केली आहे. आज जाहीर करण्यात आलेली सहायक सरकारी अभियोक्ता, गट-अ या संवर्गाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची आहे, असे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## अवैध गुटखा व तत्सम पदार्थांची वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई होणार

### अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम

**मुंबई :** राज्यात गुटखा, पान मसाला आणि तत्सम प्रतिबंधित पदार्थांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जाईल, असे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी विधानसभेत सांगितले.



राज्यात तंबाखू मिश्रित पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्या बाबतचा प्रश्न सदस्य आशिष शेलार, अतुल भातखळकर, योगेश सागर यांनी उपस्थित केला होता.

मंत्री आत्राम म्हणाले की, गुटखा, पान मसाला व इतर तत्सम प्रतिबंधित पदार्थांची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा वाहतुकीचा परवाना तसेच वाहन चालकाचा परवाना रद्द करणेबाबत संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणा ला सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यात गुटखा उत्पादन करण्यास प्रतिबंध असून शेजारच्या राज्यामध्ये गुटख्याचे उत्पादन केले जाते. इतर राज्यातील उत्पादकांवर राज्य शासना कडून थेट कारवाई करता येत नाही. परंतू राज्यात प्रतिबंधित पदार्थाच्या वाहतुकीसाठी वाहन, गोदाम वापरले तर ती वाहने, गोदाम सील करण्या बाबतचे संबंधितांना आदेश देण्यात आले आहेत. अवैध गुटखा विक्री रोखण्यासाठी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व नियम २०११ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येत असल्याचेही मंत्री आत्राम यांनी यावेळी सांगितले.

## ऊर्जा क्षेत्रात जर्मनीशी सहकार्य वाढवणार

### -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई -** पर्यावरणपूरक आणि पर्यावरणसंवर्धक ऊर्जा ही काळाची गरज बनली असून या पार्श्वभूमीवर ऊर्जा आणि अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात जर्मनीशी सहकार्य वाढवणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



जर्मन व्हाईस चान्सलर डॉ रॉबर्ट हॅबेक यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी उद्योग, व्यापार, आर्थिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील सहकार्य यासंदर्भात चर्चा झाली.यावेळी जर्मनीचे राजदूत डॉ फिलिप अॅकरमन, कौन्सुल जनरल अॅकिम फॅबिग, राजशिष्टाचार विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, संचालक पी अन्बलगन, उद्योग विभागाचे विकास आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी तसेच २० जर्मन कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जर्मनीतील माध्यम प्रतिनिधी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र आणि जर्मनी यांच्यात ऊर्जा क्षेत्रात असलेले सहकार्य स्थैर्य देणारे ठरले आहे. पुण्यात मोठ्या प्रमाणावर जर्मन कंपन्या आहेत.

अर्थव्यवस्थेला अधिक गती देण्यासाठी हे सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे. उद्योग आणि इतर क्षेत्रातही राज्य अग्रेसर आहे.देश आणि राज्य झपाट्याने विकसित होत आहे. राज्याची अर्थव्यवस्था अधिक भक्कम करण्यासाठी रोड मॅप तयार करण्यात आला आहे. स्पीड ऑफ डेटा आणि स्पीड ऑफ ट्रॅव्हल यापुढील काळात महत्त्वाचे ठरणार असून या दोन्ही क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर आहे. तसेच स्टार्ट अप आणि युनिकॉर्न मध्येही महाराष्ट्र अग्रेसर आहे. ग्रीन हायड्रोजन पॉलिसी, सौर कृषी वाहिनी यासारखे नाविन्यपूर्ण प्रकल्प व धोरणे राज्यात राबविण्यात येत आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक पद्धतीवर सुरू असून चार्जिंग सुविधाही उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

जर्मन व्हाईस चान्सलर डॉ. रॉबर्ट हॅबेक म्हणाले, उद्योग आणि आर्थिक क्षेत्रासह अनेक क्षेत्रांत सहकार्याच्या मोठ्या संधी आहेत. शैक्षणिक क्षेत्रातही दोन्ही देशांमध्ये मोठ्या प्रमाणात आदान प्रदान होत असल्याचे डॉ. हॅबेक यांनी सांगितले. ★★★

# नाचणी, बाजरी, ज्वारी खा अन् तंदुरुस्त राहा !

### आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष - विशेष वृत्त -

आजच्या धावपळीच्या युगात पिझ्झा, बर्गरसारख्या फास्ट फुडमुळे नागरिकांमध्ये आरोग्याच्या समस्या वाढत असून शरीराला आवश्यक ते पोषक घटक मिळत नाहीत. ही परिस्थिती जगभर असल्याने २०२३ हे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. पौष्टिक तृणधान्य वर्ष अंतर्गत नाचणी, बाजरी, ज्वारी, राजगिरा आणि भगर या पौष्टिक तृणधान्यांचे उत्पादनात वाढ होवून आपल्या आहारातही या धान्याचा वापर वाढावा, यासाठी या तृणधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी कृषी विभागाकडून वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.धुळे जिल्ह्यात खरीप वर्ष २०२३-२४ मध्ये बाजरीचे ५५हजार ५५१ हेक्टर, ज्वारी ८ हजार ७२१ हेक्टर, नागली १ हजार ६९० हेक्टर तसेच १ हजार २८७ हेक्टरवर इतर तृणधान्य पिकांच्या लागवडीचे नियोजन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षां निमित्त पौष्टिक तृणधान्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाचणी, बाजरी, ज्वारी, राजगिरा, नाचणी, राळा आदींचे उत्पादन वाढवून त्यांचा आहारात समावेश करण्यावर भर दिला जात आहे. या तृणधान्यांमध्ये उत्तम असे पोषक अन्न घटक आहेत.त्यातील तंतूमय पदार्थ शरीरातील विषारी घटक बाहेर काढण्यास फायदेशीर ठरतात. शिवाय रक्तातील कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करणे तसेच कर्करोगापासून सुरक्षा, मधुमेह, रक्तदाब,दमा, यकृतांचे आजार आदी बाबतीत उपयोगी ठरते. ही पिके कमी पाण्यावर येणारी आहेत. त्यांचे क्षेत्र अलीकडे सुमारे ६२ टक्क्यांपर्यत कमी झाले आहे. यामुळे २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून पाळण्याचे जागतिक पातळीवर निश्चित केले आहेत. कृषी विभागाच्या वतीने आंतर राष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त वर्षभर विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहे. नाचणी, बाजरी, ज्वारी, राजगिरा, राळा आदी पिकांचे उत्पादन वाढावे, यासाठी शेतकरी मेळाव्यांचे, चर्चासत्र, आठवडी बाजाराचे आयोजन, बियाणे विक्रेत्यांमध्ये याविषयी जनजागृती केली जात आहे. तृणधान्यांचे आहारातील पोषणमूल्य



### आरोग्यवर्धक ज्वारी

पोषण मूल्ये प्रथिने १०.४ टक्के, कर्बोदके – ७२.६ टक्के, स्निग्ध पदार्थ १.९१%, कर्बोदके– ७२.६ %, स्निग्ध पदार्थ १.९१ %, खनिजे १.६% असे प्रमाण ज्वारीत असून ज्वारी मुळे ग्लुटेनमुक्त,फायबर, पोटॅशियम, लोह, जस्त, फॉस्फरस, जीवनसत्त्वे, खनिजे व सूक्ष्म पोषण घटक रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते, पचनास हलकी, पोटाचे, त्वचेचे आजार कमी होतात. रक्ताभिसरण वाढवते, वजन कमी करते, हाडांच्या आरोग्यासाठी उप युक्त, ऊर्जा पातळी सुधारते, हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत होते.

### आरोग्यवर्धक नाचणी

नाचणीमधील पोटॅशियममुळे मूत्रपिंड, हृदय व मेंदू उत्कृष्टपणे काम करतात.व्हिटॅमिन बी हे मेंदूच्या कार्यापासून ते निरोगी पेशी विभाजना पर्यंत उपयोगी, शरीराच्या कॅल्शिअम पूर्ततेसाठी उपयोगी, हाडाचे आरोग्य सुधारते, थकवा कमी करण्यास मदत, शक्तीवर्धक, पित्तशामक असल्याने नाचणी रक्त शुद्ध करण्यास उपयुक्त आहे. कॅल्शियम आणि लोह मुबलक असल्याने गरोदर माता व वयोवृद्ध व्यक्तींना हाडांसाठी व ॲनिमियावर नाचणीचे पदार्थ उपयोगी ठरतात. नाचणीमुळे लठ्ठपणा कमी करणे, मधुमेही रुग्णांसाठी गुणकारी, यकृतातील चरबी कमी करण्यास मदत होते. फायबरमुळे खराब कोलेस्ट्रॉल नियंत्रित, आतड्यासंबंधित आजार अथवा कर्करोगास आळा बसण्यास मदत होते.

### आरोग्यवर्धक बाजरी

बाजरीमध्ये कॅल्शियम, विटामिन A,B, व फॉस्फरस, लोह,मँगेनीज अधिक मात्रेत उपलब्ध असते. रक्तातील मेदाचे प्रमाण नियंत्रित, रक्तदाबावर नियंत्रण, हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी व ॲनेमिया आजारावर मात करण्यासाठी बाजरी उपयुक्त आहे. बाजरीत प्रथिने अधिक, ग्लुटेन फ्री असल्याने पचनास सोपे हृदयास सक्षम करते, फॉस्फरस उच्च प्रमाणात आढळते, त्यामुळे पेशींमधील ऊर्जा व खनिज पदार्थ साठविण्यास मदत होते. लोहाचे प्रमाण असल्याने हिमोग्लोबीन वाढीस फायदेशीर आहे.

### आरोग्यवर्धक राजगिरा

पोटॅशियम व फायबर, प्रोटिन्स मोठ्या प्रमाणात आढळते. संधिवात, सांधेदुखी, हृदयासाठी उपयोगी. ग्लुटेन फ्री फायबरमुळे वजन कमी करण्यास उपयुक्त, मॅग्नेशिअम अधिक प्रमाणात असल्याने मायग्रेनसाठीही उपयुक्त आहे.

### आरोग्यवर्धक राळा

राळ्यामध्ये लोहाचे प्रमाण जास्त असल्याने मेंदूची कार्यक्षमता वाढवते. त्यातील अँटीऑक्सिडन्ट हा गुणधर्म रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो. मोड आलेले राळा खाल्ल्यास हाडांचा ठिसूळपणा कमी होऊन हाडे बळकट होतात. तसेच अर्धशिशी, निद्रानाश, कॉलरा, ताप यांच्या उपचार पद्धती मध्ये राळ्याचा प्रामुख्याने वापर होतो.

### आरोग्यवर्धक वरई

नवजात शिशु, बालक आणि माता यांच्यासाठी उत्तम पोषकधान्य आहे. सदृढ आरोग्य व रोगप्रतिकार क्षमता वाढविण्यास वरई उपयुक्त आहे. वरई मधुमेह, हृदयरोग यासारख्या रोगांचा प्रादुर्भाव कमी करते.★★★

## राज्याच्या सर्व नागरिकांना मिळणार महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे कवच आरोग्य संरक्षण प्रती कुटुंब दीड लाखावरून पाच लाख रूपये

**ठाणे :** मुंबई :- महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना ही राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक, अधिवास प्रमाणपत्र धारण करणाऱ्या नागरिकांना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे राज्याच्या सर्व नागरिकांना आरोग्य कवच प्राप्त होणार असून या योजनेंतर्गत आरोग्य संरक्षण प्रती कुटुंब प्रती वर्ष दीड लाख रूपयांवरून ५ लाख रूपये एवढे करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे होणारे लाभ व वैशिष्ट्ये :- राज्यात यापूर्वी केशरी शिधापत्रिका व अंत्योदय शिधापत्रिका असणाऱ्या नागरिकांनाच या योजनेचा लाभ मिळत होता. मात्र, यापुढे राज्यातील सर्व नागरिकांना आरोग्य संरक्षणाचे कवच प्राप्त होणार आहे. विद्यमान महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत – प्रधानमंत्री जनआरोग्य या एकात्मिक योजनेत काही बदल करून योजनेचे विस्तारीकरण करून सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. अशाप्रकारे केंद्र व राज्याची एकत्रित योजना राबविणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा समावेश झाला आहे.

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत आरोग्य संरक्षण प्रती कुटुंब प्रती वर्ष ५ लाख रूपये आहे. आता महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गतही आरोग्य संरक्षण प्रती कुटुंब प्रती वर्ष ५ लाख रूपये एवढे करण्यात आले आहे.

दोन्ही योजनांचे एकच कार्ड, कार्ड वाटप लवकरच सुरू होणार

आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या एकत्रित अंमलबजावणीमुळे दोन्ही योजनांमध्ये समाविष्ट उपचारांचा लाभ लाभार्थ्याला मिळणार आहे. तसेच दोन्ही योजनांच्या अंगीकृत रुग्णालयांमध्ये उपचार घेता येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये ९९६, तर प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये १२०९ उपचार आहेत. आता दोन्ही योजनांमध्ये उपचारांची संख्या १३५६ एवढी करण्यात आली आहे. महात्मा फुले जन आरोग्य व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेमध्ये अंगीकृत रूग्णालयांची संख्या एक हजार एवढी आहे.

मूत्रपिंड शस्त्रक्रियेसाठी महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये उपचार खर्च मर्यादा प्रती रुग्ण २.५ लाख एवढी मर्यादा आहे. ती आता ४.५ लाख रूपये एवढी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महात्मा फुले जनआरोग्य योजना ही याआधीच महाराष्ट्र – कर्नाटक सीमा भागात लागू करून सीमेलगतच्या महाराष्ट्र राज्यातील ८ जिल्ह्यांत १४० व कर्नाटक राज्यातील १० अतिरिक्त रुग्णालये अंगीकृत करण्याचा निर्णय झाला आहे. याव्यतिरिक्त २०० रुग्णालये अंगीकृत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेच्या शासन निर्णयातील तरतुदीमध्ये सुधारणा करून रस्ते अपघातासाठीची उपचारांची संख्या ७४ वरून १८४ अशी वाढविण्यात आली आहे. उपचाराच्या खर्च मर्यादेत ३० हजार रुपयांवरून प्रती रुग्ण प्रती अपघात १ लाख रूपये, अशी वाढ करण्यात आली आहे. या योजनेचा समावेश महात्मा फुले जन आरोग्य योजनेत करण्यात आला आहे. यामध्ये राज्याच्या भौगोलिक क्षेत्रातील रस्ते अपघातात जखमी झालेल्या, राज्यातील व देशातील रुग्णांचा समावेश करण्यात आला आहे.

## शेतकऱ्यांना केवळ एक रुपयात मिळणार पिक विम्याचा लाभ

**ठाणे :** राज्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमुळे अनेकदा मोठे नुकसान सोसावे लागते. त्यांचे हे नुकसान कमी करण्यासाठी पिक विमा योजना राबविण्यात आली आहे. मात्र, त्याचा हप्ता काही वेळेस शेतकऱ्यांना भरणे जड ठरते. त्यामुळे अनेक शेतकरी पिक विमा घेत नाहीत. त्यांची ही अडचण ओळखून राज्य शासनाने सर्वसामावेश पिक विमा योजने राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या हिस्स्याची रक्कम राज्य शासन भरत आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळण्यास मदत होणार आहे. ही योजना खरीप व रब्बी हंगामासाठी सन २०२३-२४ पासून ते २०२५-२६ या तीन वर्षासाठी राबविण्यात येणार आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा याकरिता प्रधानमंत्री पिक विमा योजना कृषी विभागामार्फत राबवण्यात येते. सन 2023-24 पासून सर्वसमावेशक पिक विमा योजना या योजनेद्वारे विमा हप्त्याची शेतकरी हिस्स्याची रक्कम राज्य शासनामार्फत भरण्यात येणार आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांना केवळ एक रुपया भरून पिक विमा पोर्टलवर नोंदणी करता येईल. इलेक्ट्रॉनिक ट्रॅकिंग व नाव नोंदणी सुरळीत करण्यासाठी शेतकऱ्यांमार्फत विमा हप्त्याच्या ऐवजी किमान एक रुपयाचे टोकन आकारले जाईल.

यासाठी मिळणार नुकसान भरपाई

सर्व समावेशक पीक योजना खरीप व रब्बी हंगामाकरिता खालील बाबींकरिता राबविण्यात येणार

१) हवामानातील प्रतिकुल घटकामुळे व अपुऱ्या पावसामुळे पीक पेरणी/लावणी न झाल्यामुळे होणारे नुकसान **(Prevented sowing/Planting/Germination)**

२) पिकांच्या हंगामामध्ये हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे होणारे पिकांचे नुकसान (**Mid season adversity**).

३) पीक पेरणी पासून काढणीपर्यंत नैसर्गिक आग, वीज कोसळणे, गारपीट, चक्रीवादळ, पूर, क्षेत्र जलमय होणे, भूस्खलन, दुष्काळ, पावसातील खंड, किड व रोग इ. मुळे उत्पन्नात होणारी घट (पीक कापणी प्रयोगावरून)

४) स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान **(Localised Calamities)**

५) नैसर्गिक कारणामुळे होणारे काढणीपश्चात नुकसान **(Post harvest Losses)** कोकणातील भात, नाचणी व उडिदचा समावेश

येत्या खरीप हंगामामध्ये कोकण विभागामध्ये भात, नाचणी व उडिद या पिकांकरीता पीक विमा उतरविता येईल. सर्वसमावेशक पिक विमा योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार नुकसान भरपाई अदा करण्यात येईल. पिकांचे सरासरी नुकसान काढताना भात, गहू, सोयाबीन व कापूस पिकांच्या किमान ३० टक्के भारांकन तंत्रज्ञान आधारित उत्पादनाला देण्यात येणार आहे. त्याचा पीक कापणी प्रयोगांमार्फत प्राप्त उत्पन्नास मेळ घालून पिकांचे उत्पादन निश्चित करण्यात येईल. उर्वरित अधिसूचित पिकांची नुकसान भरपाई नियमित पीक कापणी प्रयोगांच्या आधारावर निश्चित करण्यात येणार आहे.

अंमलबजावणीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

योजनेची अंमलबजावणी करताना रिमोट सेन्सिंग टेक्नॉलॉजी, ड्रोन, स्मार्टफोन, डिजिटल प्लॅटफॉर्म इ. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट जमा करण्यात येईल.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार अंमलबजावणी यंत्रणांची निवड झाल्यानंतर या योजनेमध्ये शेतकरी पीक विमा पोर्टल, सामायिक सुविधा केंद्र, बँक इत्यादी माध्यमांद्वारे सहभागी होऊ शकतात. शेतक-यांनी पीक विमा संरक्षणाचा लाभ मिळण्याकरीता योजनेत मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन कोकण विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक अंकुश माने यांनी केले आहे.

**संकलन : नंदकुमार ब. वाघमारे,**
प्र.जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे

## चहा पावसाळ्यात तुमच्या आरोग्याची काळजी घेईल

पावसाळा मनाला कितीही आल्हाद दायक असला तरी तो अनेक आजार आपल्यासोबत घेऊन येतो हे नाकारता येणार नाही. या ऋतूमध्ये लोकांना अनेकदा टायफॉइड, डेंग्यू, मलेरिया सारख्या आजारांना सामोरे जावे लागते. एवढेच नाही तर या ऋतूत खोकला, सर्दी यां सारख्या समस्या उद्भवतात. म्हणून, लोकांना त्यांच्या खाण्याच्या सवयींची काळजी घेण्याचा सल्ला दिला जातो. पावसाळ्याच्या दिवसात तुम्हाला अनेकदा चहा प्यावासा वाटत असल्याने या ऋतूत तुमच्या आहारात अशा चहाचा समावेश करा, ज्यामुळे तुमची रोग प्रतिकारक शक्ती मजबूत होईल आणि तुम्ही आजारांपासून दूर राहाल. चला तर मग जाणून घेऊ या.

**हळदीचा चहा प्या -** हळदीचे दूध अनेकदा घरांमध्ये बनवले जाते आणि लोकांना हे सोनेरी दूधप्यायलाही आवडते. पण तुम्हाला हवं असेल तर तुम्ही हळदीचा चहाही बनवू शकता. हळदी मध्ये कर्क्युमिन असते, ज्यामध्ये दाहक-विरोधी आणि अँटी ऑक्सिडंट गुणधर्म असतात. हे रोग प्रतिकारक शक्ती मजबूत करते तसेच संपूर्ण आरोग्य सुधारते. ते बनवण्यासाठी गरम पाण्यात अर्धा चमचा हळद मिसळा त्यात चिमूटभर काळी मिरी घालावी. मधा सारखा नैसर्गिक गोडवा घाला व आनंद घ्या.



**दालचिनी चहा प्या -** दालचिनी तुम्हाला फक्त उबदार वाटत नाही, तर ती पचन आणि रक्ताभिसरणा साठीही खूप चांगली मानली जाते. त्यात अँटी-मायक्रोबियल, अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म देखील आहेत जे पावसाळ्यात श्वसन संक्रमणाशी लढण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. दालचिनीचा चहा बनवण्या साठी दालचिनीची कांडी घ्या. सुमारे १० मिनिटे गरम पाण्यात ठेवा. त्यानंतर पाणी गाळून प्या. हवे असल्यास त्यात थोडासा लिंबाचा रस, मधही मिसळू शकता.

**पेपरमिंट चहा प्या -**

पावसाळ्यात पेपरमिंट चहा घेणे देखील चांगली कल्पना आहे. वास्त विक या ऋतूत लोकांना पचनाच्या समस्यांना सामोरे जावे लागते. दूषित अन्न किंवा पाणी खाल्ल्याने फुगणे, अपचन आणि पोटाच्या इतर समस्या उद्भवतात. पण पेपरमिंट चहा पचनास मदत करतो. त्यामुळे पोटाला आराम मिळतो. तसेच, ते तुम्हाला ताजेपणा आणि थंडपणाची भावना देते. पेपरमिंट चहा उद्भवतात. पण पेपरमिंट चहा पचनास मदत करतो. त्यामुळे पोटाला आराम मिळतो. तसेच, ते तुम्हाला ताजेपणा आणि थंडपणाची भावना देते. पेपरमिंट चहा चहा प्या-

कॅमोमाइलमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म आहेत, याचा अर्थ ते तणाव कमी करते आणि तुम्हाला आरामशीर वाटते. एवढेच नाही तर ते पचनास मदत करते आणि रोगप्रतिकारक शक्तीलाही लाभ देते. यामुळे तुम्हाला घसा खवखवण्या पासून ते पावसाळ्यात नाक बंद होण्यापर्यंतच्या परिस्थितीपासून आराम मिळतो. हा चहा बनवण्यासाठी कॅमोमाइलची फुले गरम पाण्यात काही मिनिटे भिजत ठेवा. नंतर गाळून घ्या. तुम्हाला हवे असल्यास त्यात मध किंवा लिंबू घाला. ★★★

## ठाणे येथील जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग १ च्या वतीने राजेंद्र देशमुख, विजय पाखले, एन.ए. कदम यांचा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न

**डोंबिवली (सौ.सीमा वखरे यांजकडून) :** ठाणे येथील जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग १ च्या वतीने टेलिफोन एक्सचेंज चरई, ठाणे येथील सभागृहात नुकताच तीन दिग्गजांच्या सेवा निवृत्तीचा निरोप समारंभ संपन्न झाला.

त्याबाबत सविस्तर वृत्त असे की, श्री .एन .पी दाणेज जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग - १, सहकारी संस्था ठाणे यांनी विशेष लेखापरीक्षक वर्ग - १, सहकारी संस्था ठाणे व अधिनस्त ठाणे जिल्ह्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद यांच्या वतीने सेवा निवृत्तीचा कार्यक्रम आयोजित केला होता.











प्रथम मान्यवरांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध शिव व्याख्यात्या, सूत्रसंचालिका सौ. करुणाताई गगे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यालयीन अधीक्षक श्री .सुरेश घरत यांनी केले. यामध्ये श्री .राजेंद्र देशमुख विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेखापरीक्षण), पुणे विभाग पुणे, श्री. विजय पाखले विशेष लेखापरीक्षक वर्ग - २, सहकारी संस्था (प्रक्रिया), ठाणे, तसेच श्री .एन .ए कदम लेखापरीक्षक श्रेणी - २, सहकारी संस्था, मुंबई, यांचा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात अधिकारी कर्मचारी व सत्कार मूर्तींच्या कुटुंबासह मित्र परिवारा सह हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. तानाजी कवडे अपर निबंधक, सहकारी संस्था लेखापरीक्षण ,महाराष्ट्र राज्य पुणे हे होते. तर या कार्यक्रमाला श्री . राम शिर्के विशेष कार्य अधिकारी (पदुम) ,महाराष्ट्र राज्य, मुंबई, श्री. बी .टी बोत्रे विशेष लेखापरीक्षक वर्ग - २, अधिन विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लेखापरीक्षण ,नवी मुंबई, श्री . प्रकाश मांढरे भावसार विशेष लेखापरीक्षक वर्ग - २, श्री. राजेंद्र वखरे क्राईम बॉर्डर चे संपादक तथा क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष त्याचबरोबर आश्रय महिला संस्थेच्या अध्यक्षा तसेच श्री स्वामी सखा मासिकाच्या संपादिका सौ. सीमाताई वखरे, डॉ.मंगलाताई खडसे व आदी मान्यवर उपस्थित होते. सत्कार मूर्ती यांच्या बद्दल श्री तानाजी गव्हाणे उपाध्यक्ष महाराष्ट्र स्टेट ऑडिटर असोसिएशन नागपूर सचिव लेखापरीक्षक कर्मचारी पतसंस्था, श्री विजय कांबळे ऑडिटर असोसिएशन अध्यक्ष मुंबई जिल्हा संचालक



लेखापरीक्षक विभाग कर्मचारी पतसंस्था मुंबई, श्री .संतोष भोसले खजिनदार लेखापरीक्षक विभाग कर्मचारी पतसंस्था ,मुंबई, सौ.मोहिनी देसले, राजेंद्र वखरे ,सौ. पाखले ,राजू अहिरे ,बी.पी. देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सत्कारमूर्ती राजेंद्र देशमुख, विजय पाखले व एन.ए.कदम यांनी त्याच्या कारकीर्दीतील अनुभव व मनोगत व्यक्त करून आतापर्यंत ज्या ज्या ठिकाणी काम केले त्या त्या ठिकाणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे त्यांनी सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले .त्याचबरोबर या सर्वांनी ठाणे जिल्ह्याच्या वतीने श्री एन .पी .दाणेज जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग - १ सहकारी संस्था ठाणे च्या वतीने निरोप समारंभ आयोजित केल्याबद्दल विशेष आभार व्यक्त केले.

श्री .तानाजी कवडे यांनी या सत्कार समारंभाला येऊन सर्वांना आस्थापना व कामकाजाबद्दल मौलिक मार्गदर्शन देऊन शुभेच्छा दिल्या. त्याबद्दल सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाने त्यांचे विशेष आभार मानले. यावेळी सर्वजण भावनिक झाले होते. कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीत होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत कचरा व्यवस्थापनात हलगर्जी

डोंबिवली (प्रतिनिधी) : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीचा मोठ्या प्रमाणात विस्तार झालेला असून या ठिकाणी लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे . त्यामुळे कचऱ्याचे प्रमाण सुद्धा वाढत असून घरगुती कचरा मोठ्या प्रमाणात वाढला असून महानगरपालिकेने ओला कचरा व सुका कचरा असे वर्गीकरण केले असल्याने त्याचा फायदा होत आहे.परंतु संबंधित विभागाच्या कचरा उचलणाऱ्या गाड्या ह्या नियमित व वेळेवर कचरा उचलण्यासाठी येत नसल्याने २/२कधी कधी ३/३ दिवस कचरा साचलेले सोसायट्यांचे डबे /पेट्या रस्त्यावर पडून असतात त्यातून दुर्गंधी येत असल्याने नागरिकांना त्याचा त्रास सोसावा लागतो .त्यासाठी संबंधित विभागाने दररोज कचरा उचलण्यासाठी घंटागाडी पाठवण्याची मागणी जनतेतून होत आहे.

# ढगफुटी म्हणजे काय?

ढगफुटी म्हणजे अचानक, अभूतपूर्व मुसळधार पाऊस जो स्थानिक स्वरूपाचा असतो आणि कृतीत अचानक येतो. २० ते ३० चौरस किमी क्षेत्रामध्ये १०० मिमी किंवा १० सेमी प्रति तास पेक्षा जास्त पाऊस या श्रेणीत येतो. ढगफुटीची व्याख्या भू-जलविज्ञानीय धोका म्हणून केली जाते. निसर्गातील आक्रमकता आणि पावसाच्या विनाशाचे प्रमाण कधीकधी भीतीदायक असते. भारतात जून महिन्यापासून नैऋत्य मॉन्सूनच्या काळात ढगफुटी होते. ढगफुटीचा अंदाज लावणे कठीण आहे कारण ते अचानक आपत्तीजनक शक्तीसह उद्भवते आणि त्यामुळे पूर आणि झीजमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

**ढगफुटी म्हणजे काय?**

ढगफुटी म्हणजे कमी कालावधीच्या, तीव्र पावसाच्या घटना छोट्या भागात. ही हवामानाची एक घटना आहे ज्यात अंदाजे 20-30 चौरस कि.मी. च्या भौगोलिक प्रदेशात 100 मिमी / तासापेक्षा जास्त अनपेक्षित पाऊस पडतो.

घटना सापेक्ष आर्द्रता व ढगांचे आच्छादन कमाल पातळीवर असून कमी तापमान व मंद वारे यामुळे ढगांचे मोठ्या प्रमाणात अत्यंत जलद गतीने संघनन होऊन त्याचा परिणाम ढगफुटी होण्यात होऊ शकतो.जसजसे तापमान वाढत जाईल तसतसे वातावरण अधिकाधिक बाष्प धारण करू शकते आणि हा ओलावा कमी कालावधीसाठी कमी तीव्र पाऊस म्हणून खाली येतो बहुधा अर्धा तास किंवा एक तास, परिणामी डोंगराळ भागात अचानक पूर येतो आणि शहरांमध्ये शहरी पूर येतो.

**ढगफुटी किती सामान्य आहेत?**

ढगफुटी ही काही असामान्य घटना नाही,



विशेषत: पावसाळ्याच्या महिन्यांमध्ये.यापैकी बहुतेक हिमालयीन राज्यांमध्ये घडतातजेथे स्थानिक टोपोलॉजी,वारा प्रणाली आणि तापमानाचे ग्रेडियंट्स खालच्या आणि वरच्या वातावरणाच्या दरम्यान अशा घटना घडण्यास मदत करतात. तथापि, ढगफुटी म्हणून वर्णन केलेली प्रत्येक घटना प्रत्यक्षात, व्याख्येनुसार, ढगफुटी नसते. कारण या घटना अत्यंत स्थानिक असतात. ते खूप लहान भागात घडतात जे बऱ्याचदा पाऊस मोजण्याच्या साधनांपासून वंचित असतात.

या घटनांचे परिणाम मात्र छोट्या-छोट्या क्षेत्रांपुरते मर्यादित नाहीत. भूप्रदेशाच्या स्वरूपामुळे, अतिवृष्टीच्या घटनांमुळे अनेकदा भूस्खलन आणि अचानक पूर येतात, ज्यामुळे खालच्या प्रवाहात मोठ्या प्रमाणात विनाश होतो.हेच कारण आहे की डोंगराळ भागातील जीवित आणि मालमत्ता नष्ट करण्यास कारणीभूत ठरणाऱ्या प्रत्येक अचानक मुसळधार पावसाचे वर्णन ढगफुटीठ म्हणून केले जाते, पावसाचे प्रमाण परिभाषित निकषांची पूर्तता करते की नाही याची पर्वा न करता.त्याच वेळी, हे देखील शक्य आहे की दुर्गम ठिकाणी ढगफुटीच्या वास्तविक घटनांची नोंद केली जात नाही.

# मणिपूर हिंसाचार व बलात्कार प्रकरणातील आरोपींना फाशी द्या' आरपीआय पिंपरी चिंचवड शहर कार्यकारिणीची मागणी.

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे पिंपरी चिंचवड शहर जिल्हा अध्यक्ष स्वप्नील कांबळे यांनी पोलीस आयुक्तांकडे मागणी.**

**पिंपरी** : दि.२४ जुलै : मणिपूर येथील हिंसाचार व बलात्कार प्रकरणातील सर्वच्या सर्व नराधम आरोपींना तात्काळ अटक करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पिंपरी चिंचवड शहर कार्यकारिणी, सभासद, पदाधिकारी तसेच समस्त कार्यकर्त्यांच्या वतीने मणिपूर येथील हिंसाचाराचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. अशा अमानवी घटनेतील सर्व आरोपींना तत्काळ अटक करून त्यांना फाशीचीच शिक्षा द्यावी अशी ठाम मागणी आरपीआय (आ) पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने पोलीस आयुक्त कार्यालयाकडे करण्यात आली.



यावेळी शहराध्यक्ष स्वप्नील कांबळे यांच्या मार्गदर्श नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या पत्रात नमूद केले आहे की , केंद्र शासन , पोलीस प्रशासन व न्याय व्यवस्था यांनी देशभरातील नागरिकांच्या संतप्त भावनांचा विचार करुन आरोपींना तात्काळ शिक्षा रावी.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पिंपरी चिंचवड शहर कार्यकारिणी, सभासद, पदाधिकारी तसेच समस्त कार्यकर्त्यांसह मणिपूर येथील अमानवी हिंसाचाराचा जाहीर निषेध व्यक्त केला.यावेळी आरपीआय (आठवले) पक्षाचे शहराध्यक्ष स्वप्नील कांबळे, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष के. एम. बुक्तर, पश्चिम महाराष्ट्र सचिव रमेश चिमुरकर, शहर जनरल सेक्रेटरी बाळासाहेब रोकडे, शहर कार्यध्यक्ष लिंबराज कांबळे, शहर उपाध्यक्ष विलास कांबळे, शहर प्रवक्ता भारत बनसोडे, शहर उपाध्यक्ष रमेश गजरमल, पिं. चिं. शहर सल्लागार विलास पाटील, शहर सचिव विक्रम कांबळे, मातंग आघाडी अध्यक्ष अश्विन खुडे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष सचिन देडे, सचिव शेषराव सूर्यवंशी, बलभीम सोनकांबळे, उपाध्यक्ष प्रमोद वाघमैतर, संजय वाघमारे, दिलीप साळवे, सिद्धार्थ गायकवाड व शहरातील इतर बहुसंख्य कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# कैवल्यधामद्वारे योगावरील योगिक विज्ञान माहितीपटाचं विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते प्रकाशन

**मुंबई** :- कैवल्यधाम योग संस्थेच्या शतक महोत्सवी योगिक विज्ञान नावच (documentory)माहिती पट अधिकृत प्रकाशन महाराष्ट्र राज्य विधान सभेच अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास मा. केंद्रीय मंत्री तसेच कैवल्य धाम शताब्दी वर्ष समितीचे अध्यक्ष मा श्री सुरेश प्रभू यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरवात दीप प्रजलन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. व कैवल्य धाम चे मुख्य अधिकारी सुबोध तिवारी यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर व मा केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांचा सन्मान केला...नार्वेकर यांनी सांगितले कि पंतप्रधान नरेंद्र मोदी नी योग हे स्वदेशी माध्यम आहे विज्ञानाचा. योग ने पूर्ण जगाला आपल्या सावली खाली घेतल आहे. आणि कैवल्य धाम हे माध्यम जगभर प्रसिद्धी होवो व शुभेच्छा दिल्या

मा. केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांनी मनोगतात शुभेच्छा व आपण सगळे या महोत्सवी आलात कैवल्य धाम ला भेट दिली योग मुळे आपणास जगण्याची एक मोठी चुनौती आहे आणि हे या



कैवल्य धाम योग साधना करुन ते समजून घेतलं आणि त्यांनी ते लोकांपर्यंत पोहोचवले सुद्धा..

या योगिक विज्ञान (science)माहिती पट बनविणारे पवन चौधरी व आदित मोहिते यांनीही आपले मनोगत व्यक्त केलमाहिती पटच्या केंद्र स्थानी कैवल्यधाम चे संस्थापक स्वामी कुवल्यानंद यांचे अधिष्ठान आहे. स्वामी कुवल्यानंद यांनी योग चिकित्सा जगासमोर आणून केन्सर केअर,जीन थेरपी, ऑटो इम्युन्या, डिस ऑर्डर आणि त्याही पलीकडे अनेक रोगाच्या उपचारासाठी योगाच्या वैद्यकीय दृष्ट्या सिद्ध केलेल्या संशोधना सह यशस्वी पणे करत आहे. या वेळी, निनाद काशीदकर, प्रो. दिनेश पंज बानी, प्रो.राजेश विलूकर, वंदन शहा,नानिक रूपाणी,नितीन ठक्कर, मनीषा वर्मा, राजकुमार सक्सेना, जितेंद्र अरोरा, निशांत जैन, कुणाल खाणेकर आयुष दुबे, कैवल्य धाम लोणावळा स्टाफ,लोणावळा पत्रकार, बंडू कुटे आदी मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.अन्विता दीक्षित यांनी केले तर प्रस्थावना व आभार मा. सुबोध तिवारी यांनी केले हा कार्यक्रम मुंबई नरिमन पॉईंट NCPA येथे येथे उदघाटन सोहळा पार पडला.

# जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग १, सहकारी संस्था मुंबई व यांचे अधिनस्थ सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या वतीने आर. सी. शाह व एन. ए. कदम यांचा सेवा निवृत्ती कार्यक्रम संपन्न

**डोंबिवली (सौ.सीमा वखरे )** : जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग १ , सहकारी संस्था मुंबई व यांचे अधिनस्थ सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या वतीने श्री.आर.सी.शाह (से.नि.) विभागीय सहनिबंधक सह.संस्था



(लेखापरीक्षण), मुंबई विभाग, नवी मुंबई आणि श्री. एन .ए .कदम (से.नि.) लेखापरीक्षक श्रेणी - २, सहकारी संस्था, मुंबई यांचा सेवा निवृत्तीचा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. चंद्रशेखर गवाणकर जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग १, सहकारी संस्था मुंबई तसेच व्यासपीठावर सत्कारमूर्ती श्री.आर.सी.शाह, श्री.एन.ए.कदम, श्री उमेश तुपे विशेष लेखापरीक्षक वर्ग१ ,सहकारी संस्था मुंबई, अनिरुद्ध सेनगावकर प्रभारी १ ले अप्पर विशेष लेखा परीक्षक वर्ग २ , सौ.विद्या महाजन विशेष लेखा परीक्षक वर्ग २ हे होते . यावेळी सत्कारमूर्ती आर.सी.शाह व एन.ए. कदम यांनी त्याच्या कारकीर्दीतील अनुभव कथन केले.त्यांनी सर्व अधिकारी व



कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले त्याचबरोबर या सर्वांनी मुंबई जिल्ह्याच्या वतीने जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग - १ सहकारी संस्था मुंबई व यांचे अधिनस्थ सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाने च्या वतीने निरोप समारंभ आयोजित केल्याबद्दल विशेष आभार व्यक्त केले.

**विशेष कौतुक** : घाटकोपर आदित्य सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. इमारत क्रमांक ६३ पंतनगर घाटकोपर (पू.) मुंबई -७५ या संस्थेचे लेखापरीक्षणात आढळून आलेल्या गैरव्यवहार प्रकरणी पंतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून सहकार चळवळीतील लेखा परीक्षण विभागाचे महत्व अधोरेखित केले असून त्याबद्दल श्री. चंद्रशेखर गव्हाणकर यांच्या हस्ते श्री. बांगर यांच्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल त्यांचे विशेष कौतुक करून सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमात अनिरुद्ध सेनगावकर प्रभारी १ ले अप्पर विशेष लेखा परीक्षक वर्ग२ ऑडिटर युनियन मुंबई जिल्हाध्यक्ष विजय कांबळे, लेखापरीक्षक वृंद संतोष भोसले, सुरेश गायकवाड,, विजय कांबळे, कृष्णा पोळ, दयानंद नांदवडेकर, संतोष भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सेंट जॉन्स हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक मिर्झा एस.एम.बेग, दीपक कलिंगण,रेल्वे संघटना मुंबई जिल्हाध्यक्ष यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आदी मान्यवर उपस्थित होते. .



सदर निरोप समारंभात श्री.एन.ए.कदम व सौ. अनिता ताई कदम यांचा सपत्नीक सन्मान कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर गव्हाणकर यांच्या हस्ते व उपस्थितांच्या साक्षीने करण्यात आला.वडिलांची ३९ वर्ष ५ महिने २९ दिवस निष्कलंक सेवा झाली. त्यांचा ठाणे व मुंबई येथे सन्मान सोहळा पाहायला मिळाला. त्यामुळे माझ्या डोळ्यांचे फिटले असे श्री.एन.ए.कदम यांची कु. अपेक्षा कदम हिने तिचे मत व्यक्त केले.

निवेदनाच्या क्षेत्रात शहापूर तालुक्यातील बुलंद तोफ, भारदस्त आवाजाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारी,सामाजिक कार्य क्षेत्रातील नेतृत्व म्हणून निवेदिका, प्राध्यापिका सौ. करुणा सचिन गगे - बांगर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्र संचालन केले .



या विशेष कार्यक्रमाला सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद उपस्थित होते. त्याबद्दल सत्कार मुर्तींनीं सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाचे त्यांचे विशेष आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. ★★★

Printed , Published , Owned & Editor : Shivam Rajendra Vakhare, Printed at SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT. LTD. , PLOT. No. W-230 , TTC Industrial Area , Khairne MIDC, Navi Mumbai- Dist. Thane.MAHARAHTRA - 400710 Published From - Flat no 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp- Birla College Chikanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist- Thane. Pin Code- 421301- (Maharashtra) **Mob. 09987496136 / 9619630035 (T. C. No. MAHMAR 51337) , RNI.No. MAHMAR/2022/83338**

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक : शिवम राजेंद्र वखरे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया,ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू ,२३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे,एम .आय. डी . सी ., ठाणे - बेलापूर रोड ,नवी मुंबई, जि. ठाणे , पिन कोड.नं.४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर , चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण , जि. ठाणे , पिन कोड.नं.४२१३०१ येथून प्रकाशित केले.(नोंदणी टि.सी.क्र. एम ए एच एम ए आर ५१३३७) , (आर.एन.आय.नं. एम ए एच एम ए आर /२०२२/८३३३८ ) ,मो.नं.: ९९८७४९६१३६ / ९६१९६३००३५**